मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पावसाळ्यात 120 इमारतींपासून धोका!

## 7 इमारती अतिधोकादायक श्रेणीत : नोटीस पाठवण्यापलीकडे महापालिकेकडून कसलीही कारवाई नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

पावसाळा सुरू झाला आहे, शहरात महापालिकेने केलेल्या सर्वेक्षणात तब्बल १२० धोकादायक इमारती आढळून आल्या आहेत. त्यात सात इमारती ह्या अतिधोकादायक बनल्या आहेत. त्यामुळे पावसाळ्याच्या तोंडावर त्या इमारत मालकांना केवळ नोटिसा देण्यात आल्या आहेत. मात्र, हवामान खात्यानुसार यंदा पाऊस मोठ्या प्रमाणात होणार आहे. त्यामुळे धोकादायक इमारतींपासून नागरिकांना धोका झाल्यास प्रशासनाने जबाबदारी घेणार का? असा सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

पिंपरी-चिंचवड शहरात गतवर्षी ८८ धोकादायक इमारती आढळून आल्या होत्या. परंतु, या वर्षी त्यात मोठी वाढ झाली आहे. महापालिका बांधकाम विभागाने केलेल्या सर्वेक्षणात शहरात १३२ धोकादायक इमारती आढळून आल्या.



त्यापैकी पाडलेल्या आणि दुरुस्त करून सुरक्षित झालेल्या १२ इमारती वगळता उर्वरित १२० इमारती धोकादायक आहेत. त्यात सात अतिधोकादायक इमारतींचाही समावेश आहे. पावसाळा तोंडावर असताना इमारतींना प्रशासनाने नोटिसा देण्यापलीकडे ठोस कारवाई केलेली नाही.

शहरात पावसाळ्यात धोकादायक इमारती, भिंती कोसळून दुर्घटना घडतात. त्यासाठी दरवर्षी पावसाळ्यापूर्वी महापालिकेकडून जुन्या इमारती, वाडे, घरे यांचे सर्वेक्षण करून धोकादायक इमारती निश्चित केल्या जातात. आयुक्त शेखर सिंह यांनी एक महिन्यापूर्वी बैठक घेऊन अनधिकृत होर्डिंगसह धोकादायक इमारतींची पाहणी करून योग्य कारवाई करण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र, धोकादायक इमारतींबाबत पालिकेकडून केवळ माहिती संकलन व नोटिसा देण्याचे कागदी घोडे नाचवले जात आहेत. शहरात या पावसाळ्यापूर्वी एकूण १३२ धोकादायक इमारती निदर्शनास आल्या. त्यामध्ये ७ इमारती अतिधोकादायक, १२ रिकाम्या करून दुरुस्ती, ४४ रिकाम्या न करता दुरुस्तीयोग्य तसेच ६६ इमारतींची किरकोळ दुरुस्ती करणे आवश्यक होते.

पिंपळे गुरव, पिंपळे निलख, वाकडमध्ये सर्वाधिक इमारती

महापालिकेच्या सर्वेक्षणात सर्वाधिक ३९ धोकादायक इमारती ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या वाकड, पिंपळे निलख, पिंपळे गुरव या भागात आहेत. त्यापाठोपाठ ब क्षेत्रीय कार्यालयात २२, अ १७, क १६, ह १६, फ १२, ई ७ आणि सर्वांत कमी ग क्षेत्रीय कार्यालयात ३ धोकादायक इमारती आहेत.

### एकही धोकादायक इमारत पाडली नाही

» महापालिकेकडून १३२ इमारतधारकांना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. त्यापैकी इमारत मालकांनी पाडलेल्या किंवा दुरुस्त केलेल्या इमारतींची संख्या फक्त १२ आहे. उर्वरित १२० धोकादायक इमारतींबाबत कार्यवाही झालेली नसल्याचे समोर आले आहे, तर या वर्षी पालिकेने एकही धोकादायक इमारत पाडलेली नाही.

“ शहरातील कोणतीही इमारत सुरक्षित राखण्याची जबाबदारी प्रत्येक इमारत मालकाची आहे. त्यासाठी इमारतीची तपासणी तज्ज्ञ अभियंत्यांकडून करून घ्यावी. त्यांच्या सूचनेनुसार इमारत दुरुस्त करून घ्यावी किंवा पाडावी. त्याकरिता संबंधितांना प्रशासनाने नोटीस दिलेल्या आहेत.

- मकरंद निकम, शहर अभियंता, महापालिका.

# ‘इंद्रायणी फेसाळण्यास सांडपाणीच कारणीभूत’

## स्थानिक स्वराज संस्थांमुळेच सांडपाणी नदीत मिसळते : राज्य प्रदूषण मंडळाचा ठपका

**पिंपरी | प्रतिनिधी**

इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाला परिसरातील स्थानिक स्वराज्य संस्थाच जबाबदार असल्याचा ठपका महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठेवला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेसह तळेगाव दाभाडे, वडगाव मावळ या नगरपालिका सांडपाणी प्रक्रिया न करता सोडत असल्याने नदीचे प्रदूषण होत असल्याचे अहवालात म्हटले आहे.

हरित न्यायाधिकरणाने या प्रकरणी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए), पुणे जिल्हाधिकारी यांच्यावर ताशेरे ओढले आहेत. इंद्रायणी नदी सध्या फेसाळलेली दिसत असून घरगुती आणि औद्योगिक कचरा नदीच्या पृष्ठभागावर तरंगताना दिसत आहे. हरित न्यायाधिकरणाने याची स्वत:हून दखल घेतली आहे.

प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी व्ही. व्ही. किल्लेदार यांनी इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाबाबतचा अहवाल एनजीटीकडे सादर केला.



त्यामध्ये म्हटले आहे की, इंद्रायणी नदीच्या प्रदूषणास प्रामुख्याने प्रक्रिया न केलेले सांडपाणी आहे. पिंपरी- चिंचवड महापालिका, लोणावळा नगर परिषद, वडगाव नगर पंचायत, तळेगाव दाभाडे नगर परिषद, देहूरोड कॅन्टोन्मेंट, देहू नगर पंचायत आणि आळंदी नगर परिषद. या सात स्थानिक स्वराज्य संस्थांमधून एकूण पाण्याचा वापर २४९.४२ एमएलडी आहे. येथून १६८.२ एमएलडी घरगुती सांडपाणी तयार होते. मात्र, या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांची सांडपाणी शुध्दीकरण क्षमता ( एसटीपी) ९६.५ आहे. त्यामुळे ६७.३ एमएलडी सांडपाणी थेट इंद्रायणी नदीत सोडले जात आहे. याबाबत स्थानिक स्वराज्य संस्थांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नोटीसही बजावण्यात आली आहे. अहवालानुसार नदीच्या उगमापासून आळंदी नगरपालिकेपर्यंत विविध ठिकाणी नदीच्या पाण्यात डिटर्जंट पॅरामीटरचे प्रमाण खूप जास्त असल्याचे आढळून आले आहे.

एनजीटी (पश्चिम खंडपीठ) कोरमचे न्यायमूर्ती दिनेश कुमार सिंग आणि तज्ज्ञ सदस्य विजय कुलकर्णी यांनी असे निरीक्षण नोंदवले आहे की, इंद्रायणी नदीतील प्रदूषणाची कारणे तपशिलात दिली आहेत. त्यावर उपाय म्हणून अंमलबजावणी करावयाच्या सूचनाही एमपीसीबीने दिल्या आहेत. त्यामुळे या सूचनांचा विचार करायला हवा.

# फुलेवाडा स्मारक विस्तारीकरणाला वेग

## लगतचे जागामालक, भाडेकरूंना मोबदला देण्यासाठी आवश्यक रक्कम मान्य करण्याची ग्वाही

**पुणे | प्रतिनिधी**

महात्मा फुलेवाडा स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी लगतचे जागामालक आणि भाडेकरू यांना मोबदला यासाठी भूमिसंपादनाची आवश्यक तेवढी रकमेची मागणीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करावा, त्यास तत्काळ मान्यता देण्यात येईल, असे नुकतेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर केले होते. त्यानंतर महापालिका स्तरावर हालचाली सुरू झाल्या असून जागामालक आणि भाडेकरूंची लवकरच बैठक घेतली जाणार आहे.






महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले आणि शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांनी ही माहिती दिली. त्यामुळे आता स्मारकाचा प्रश्न अखेर मार्गी लागणार आहे. महात्मा फुलेवाडा स्मारकासाठी राज्य शासनाने निधी देण्याची तयारी दाखविल्यानंतर स्मारकासाठी आवश्यक जागेचे भूसंपादन करण्यासाठी महापालिका जागामालक आणि भाडेकरूंशी चर्चा करणार आहे. लवकरच ही बैठक होणार असून जागामालक आणि भाडेकरूंच्या मागण्यांवर योग्य तो निर्णय घेतला जाणार आहे.

पुणे शहरातील महात्मा फुले व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे राहते घर १९९२ मध्ये राष्ट्राला अर्पण करून ही वास्तू राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आली आहे. हे स्मारक आणि त्याच्या परिसराचे नूतनीकरण तसेच जतन करण्यासाठी आवश्यक कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात आली आहेत. या स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी लगतचे जागामालक आणि भाडेकरू यांना मोबदला यासाठी भूमिसंपादनाची आवश्यक तेवढी रकमेची मागणीचा प्रस्ताव शासनाकडे सादर करावा, त्यास तत्काळ मान्यता देण्यात येईल, असे नुकतेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर केले होते. त्यानंतर महापालिका स्तरावर हालचाली सुरू झाल्या असून जागामालक आणि भाडेकरूंची लवकरच बैठक घेतली जाणार असल्याचे महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले आणि शहर अभियंता प्रशांत वाघमारे यांनी दिली.

महात्मा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेली भिडेवाडा येथील पहिली मुलींची शाळा येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे राष्ट्रीय स्मारक उभारण्याच्या दृष्टीने महापालिकेने डिझाईन तयार केली आहे. याचे प्रस्तावित बजेट सुमारे ७ कोटींचे असून सोमवारी (दि. २४) होणाऱ्या इस्टिमेट कमिटीच्या बैठकीत यास मान्यता दिली जाणार आहे. त्यानंतर निविदा प्रक्रिया राबविली जाणार आहे.

### पहिल्या किंवा दुसऱ्या मजल्यावर सावित्रीबाईंचा पुतळा

» हे स्मारक पार्किंग तसेच तळमजला अधिक तीन असे चार मजल्यांचे असणार आहे. पहिल्या किंवा दुसऱ्या मजल्यावर सावित्रीबाई फुले यांचा पुतळा, त्यांचा जीवनपट दर्शविणारे म्युरल्स किंवा चित्रमय व्यवस्था, वरील मजल्यावर त्यांच्या जीवनातील प्रसंग, कार्याची माहिती स्क्रीनवर दृकश्राव्य स्वरूपात दर्शविण्याची यंत्रणा तसेच त्यांचे लेखनसाहित्य त्याशिवाय वरील मजल्यावर मुली, महिलांच्या कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण संस्था अशी व्यवस्था असणार आहे.

> स्मारकाच्या विस्तारीकरणासाठी सुमारे १० हजार ९४२ मीटर जागेचे भूसंपादन केले जाणार आहे. या जागेत ५१६ मालक आणि २८६ भाडेकरू आहेत. वॉर्ड ऑफिसरच्या माध्यमातून भाडेकरू, जागामालक यांची महापालिकेत बैठक घेतली जाईल. बैठकीत त्यांच्या मागण्या आणि शासनाकडून उपलब्ध पर्याय यावर चर्चा केली जाईल. योग्य ते पर्याय काढून हा प्रश्न मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न आहे.
> - डॉ. राजेंद्र भोसले, महापालिका आयुक्त.

# येरवडा मेट्रो स्थानकाचा अखेर जुलैत मुहूर्त!

## मेट्रोच्या दैनंदिन प्रवाशांची संख्या सव्वा लाखाने वाढणार असल्याचा अंदाज : परिसरात फिडर बस सेवा आवश्यक

**पुणे | प्रतिनिधी**

दीर्घ काळापासून प्रतीक्षेत असलेले येरवडा येथील महामेट्रोचे स्थानक जुलै महिन्यात सुरू होणार आहे. त्यामुळे मेट्रोच्या दैनंदिन प्रवासी संख्येत सव्वा लाख प्रवासी वाढण्याचा अंदाज वर्तवण्यात येत आहे.




महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडून (महामेट्रो) येरवडा मेट्रोस्थानकाचा जिना राष्ट्रीय क्रीडा मार्गाच्या मधोमध बांधला जात होता. त्यामुळे येरवडा बसथांब्याच्या ठिकाणी वाहनांची कोंडी होत होती. विशेष म्हणजे महापालिकेने परवानगी दिली नसतानाही मेट्रो जिना उभारत असल्याचे समोर आले होते. जिन्याचे बांधकाम काढून घेईपर्यंत मेट्रोचे काम सुरू करू देणार नसल्याची भूमिका स्थानिक रहिवाशांनी घेतली होती. त्यामुळे महामेट्रोने येरवडा मेट्रो स्थानकाचे आणि जिन्याचे काम सहा महिने बंद ठेवले होते.

वनाझ ते रामवाडीच्या तिसऱ्या टप्प्यातील मेट्रो मार्ग सुरू करण्याची घाई असल्यामुळे तब्बल सहा महिने (ऑक्टोबर २०२३ ते मार्च २०२४) येरवड्याच्या स्थानकाकडे दुर्लक्ष केले गेले होते.

यावर्षी मार्च महिन्यात रुबी हॉल ते रामवाडी या तिसऱ्या टप्प्यातील मेट्रोचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दृकश्राव्य माध्यमातून केले. यावेळी येरवडा मेट्रो स्थानक एप्रिल महिन्यात सुरू होणार असल्याचे महामेट्रोने सांगितले होते. त्यानंतर तारीख पे तारीख देत अखेर आता जुलैचा मुहुर्त निश्चित करण्यात आल्याचे महामेट्रोच्या अधिकाऱ्यांनी 'सीविक मिरर'ला सांगितले. त्यामुळे येरवडा मेट्रो स्टेशन सुरू झाल्यानंतर या ठिकाणावरून मेट्रोचे प्रवासी संख्या वाढणार आहे. येरवडा परिसरातून दैनंदिन प्रवासी संख्या पंचवीस ते तीस हजाराने वाढणार असल्याचा अंदाज आहे. सध्या मेट्रोची प्रवासी संख्या नव्वद हजार असून येरवडा मेट्रो स्थानक सुरू झाल्यास ते सव्वा लाखापर्यंत वाढू शकते, असा अंदाज आहे.

येरवडा परिसराची लोकसंख्या दीड लाख आहे. त्यामुळे येरवडा मेट्रो स्थानक सुरू झाल्यास येथील कष्टकरी, मध्यमवर्गीय, विद्यार्थी, चाकरमानी, खासगी नोकरदारांना मेट्रोमुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये जाता येणार आहे. सध्या मेट्रोची प्रवासी संख्या नव्वद हजारावर गेली आहे. आता येरवडा मेट्रो स्थानक सुरू झाल्यास ही संख्या सव्वा लाखापर्यंत जाऊ शकते, असा अंदाज आहे.

येरवडा मेट्रो स्थानकाला महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, शास्त्रीनगर सरकारी सहकारी वसाहत, राम सोसायटी, फुलेनगर, प्रतीकनगर, येरवडा प्रीझन प्रेस अशा ठिकाणी पीएमपीएलची फिडर बससेवा उपयोगी ठरू शकते. या परिसरातून दररोज हजारो प्रवासी मेट्रोला मिळतील, अशी आशा आहे.

> लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता असल्यामुळे येरवडा मेट्रो स्थानक सुरू करता आली नव्हते. आता हे मेट्रो स्थानक जुलै महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात सुरू होणे अपेक्षित आहे.
> - हेमंत सोनवणे, संचालक, महामेट्रो.

# प्रवासी वाहनांवर आरटीओचा अंकुश

## पिंपरी-चिंचवड परिसरात दोन महिन्यांत 300 वाहनांची तपासणी, 105 वाहनांवर कारवाई

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड परिसरात धावणाऱ्या प्रवासी वाहनांची विशेष तपासणी सुरू करण्यात आली आहे. क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी, कागदपत्रांची पूर्तता न करणे, नियमांचे उल्लंघन करणे यावर कारवाई करण्यात येणार आहे. पुण्यातील वाढते अपघात आणि प्रवासी वाहनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी ही मोहीम राबवली असल्याचे आरटीओ अधिकाऱ्याने सांगितले.

या पार्श्वभूमीवर गेल्या दोन महिन्यात आरटीओच्या कर्मचाऱ्यांनी ३०० वाहनांची तपासणी केली आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १०५ वाहनांवर दंडात्मक कारवाई केली आहे. आरटीओच्या वायुवेग पथकाकडून महामार्गासह शहरात सातत्याने या कारवाईवर भर दिला असल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. पिंपरी-चिंचवड शहरातील नाशिक फाटाजवळ चार दिवसांपूर्वीच एका खासगी बसच्या एसीच्या वायरिंगमध्ये बिघाड झाल्याने शॉर्टसर्किट होऊन आग लागल्याची घटना घडली. बसमधील प्रवाशांना त्यांच्या थांब्यावर उतरवून चालक गाडी पार्क करण्यासाठी भोसरीकडे निघाला होता. त्यावेळी हा प्रसंग घडला. यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. खासगी बसचालक तसेच मालकांनी वाहनाचे मेंटनन्स नियमित ठेवणे आवश्यक आहे. यासोबतच परिवहन विभागाने ठरवून दिलेल्या कागदपत्रांची पूर्तता करणेही गरजेचे आहे. ते न केल्याने अपघाताच्या घटना वाढत असल्याचे चित्र आहे. पिंपरी-चिंचवड परिसरात धावणाऱ्या प्रवासी वाहनांची विशेष तपासणी सुरू करण्यात आली आहे. क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी, कागदपत्रांची पूर्तता न करणे, नियमांचे उल्लंघन करणे यावर कारवाई करण्यात येणार आहे.

सुत्यांमध्ये रेल्वे, एसटी यांचे आरक्षण मिळत नसल्याने नागरिक खासगी बसचा पर्याय निवडतात. मात्र त्या वाहनांची माहिती प्रवाशांना नसते. ही वाहने लांबचा पल्ला गाठत असल्याने वाहनांनी सातत्याने वाहनांच्या देखभाल दुरुस्तीवर अधिक भर देणे गरजेचे आहे. त्यासोबत प्रवाशांकडून नियमानुसार भाडे आकारणी करणे, वाहनाचे पासिंग आणि फिटनेस आदी कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे. मात्र या नियमांचे उल्लंघन होत असल्याने गेल्या एप्रिल आणि मे महिन्यात पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन विभागाच्या वायुवेग पथकाने तीनशे खासगी बसेसची तपासणी केली. यामध्ये नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दोषी वाहनांवर कारवाई केली आहे.

सध्या बाजारात अति वेगाने धावणाऱ्या दुचाकी व चारचाकी वाहनांना तरुणांची मोठी मागणी आहे. कंपनीकडून वाहनांची एक निश्चित वेग मर्यादा ठेवण्यात येत असतानाही अनेक वाहन चालक स्पीड मीटरमध्ये छेडछाड करतात. दुसरीकडे पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावरील अपघात कमी करण्यासाठी शासन स्तरावर विविध उपाय योजना केल्या जात आहेत.




> **नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कार्यालयाच्या वतीने कारवाई केली जात आहे. ही कारवाई नियमितपणे चालू असते. त्याचाच एक भाग म्हणून वाहनांची तपासणी करण्यात येत आहे.**
> **- मनोज ओतारी, सहायक प्रादेशिक परिवहन अधिकारी, पिंपरी-चिंचवड**

### ...तर करा तक्रार

**» शहरात धावणारे अशा वाहनांची तपासणी वेळोवेळी आरटीओच्या माध्यमातून करण्यात येत आहे. मात्र, अनेकदा वाहनधारकांकडून प्रवाशांची आर्थिक लूट केली जाते. याबाबत नेमकी तक्रार कोठे करायची याची प्रवाशांना माहिती नसते. त्यामुळे पिंपरी चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयात त्याची तक्रार करा, असे आवाहन आरटीओच्या माध्यमातून करण्यात आले आहे.**

# आषाढी वारीच्या तोंडावर पवित्र इंद्रायणी नदीचे प्रदूषण रोखा - प्रा. कविता आल्हाट

## संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारीचा पायी पालखी सोहळा आठ दिवसांवर येऊन ठेपला

**पिंपरी | प्रतिनिधी**

संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारीचा पायी पालखी सोहळा आठ दिवसांवर येऊन ठेपला आहे. मात्र, आळंदीतील इंद्रायणी नदी पुन्हा फेसाळली आहे. त्याकडे महापालिका पर्यावरण विभागाचे दुर्लक्ष होत आहे. चिखली, कुदळवाडीतील कंपन्या सांडपाणी प्रक्रिया न करता थेट इंद्रायणीत सोडत असल्यामुळे नदी प्रदूषित होत असून आळंदी, देहू, तुळापूर अशा प्रमुख तीर्थक्षेत्रांचा नदीकाठ फेसाळलेला आहे. अशा फेसाळलेल्या नदीत वारकरी बांधव एकादशीच्या दिवशी स्नान करणार का असा संतप्त सवाल राष्ट्रवादी काँग्रेसचे महिला अध्यक्ष प्रा. कविता आल्हाट यांनी विचारला असून अशा कंपन्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे. इंद्रायणी नदीच्या प्रदूषणाबाबत निवेदनाद्वारे प्रा. कविता आल्हाट यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेचे लक्ष वेधले आहे. याबाबत पर्यावरण विभागाचे सह शहर अभियंता संजय कुलकर्णी यांना भेटून आल्हाट यांनी निवेदन दिले आहे. या निवेदनात त्यांनी म्हटले आहे इंद्रायणी नदीच्या काठावर आळंदी, देहू, तुळापूर अशी प्रमुख तीर्थक्षेत्रे आहेत. तेथे लाखो वारकरी येत असतात. इंद्रायणीस्नान, नगरप्रदक्षिणा, माउलींचे दर्शन असा वारकऱ्यांचा अलिखित नियम आहे. गेल्या वर्षभरात इंद्रायणी नदी अनेकदा फेसाळली आहे. शनिवारी सकाळी नदीला पुन्हा फेस आला आहे.





पवित्र इंद्रायणी नदी आपल्या पिंपरी चिंचवड शहरातून वाहते. चिखली हद्दीतील कुदळवाडी भागातील नाल्यांमधून रसायनमिश्रित सांडपाणी नदीमध्ये मिसळले जात आहे. या रसायनांमुळे नदीतील पाणी प्रचंड प्रमाणात प्रदूषित होत आहे. नदीत मोठ्या प्रमाणावर फेस येत आहे. महानगरपालिकेने पूर्वीही संबंधित प्रदूषित पाणी , रसायने नाल्यांद्वारे नदीमध्ये सोडणाऱ्या कंपन्यांवर कारवाई केली आहे. परंतु तरीही नदीमध्ये मोठ्या प्रमाणावर रसायनमिश्रित सांडपाणी येत आहे. याबाबतीत अशा कंप

# होर्डिंग्जवर कारवाईला मुहूर्त सापडेना

## सोलापूर, नगर महामार्गावरील गावे दुर्घटनेच्या छायेत : अजित पवारांच्या आदेशाकडे काणाडोळा

**पुणे | प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी पीएमआरडीएच्या आयुक्तांची अनधिकृत होर्डिंग्जबाबत कानउघडणी केल्यानंतर हिंजवडीतील ३ अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करण्यात आली आहे.

मात्र, पुणे-सोलापूर व पुणे-नगर महामार्गासह जिल्ह्यात हजारो अनधिकृत होर्डिंग्ज धोकादायकरीत्या उभे आहेत. त्यामुळे मोठी दुर्घटना घडल्यावरच, पीएमआरडीए कारवाई करणार का? असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.

मुंबईत घाटकोपरनंतर पुण्यातील मोशी व लोणी काळभोरमध्ये अनधिकृत होर्डिंग्ज कोसळल्याच्या घटना घडल्या होत्या. या पाश्वभूमीवर पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी अनधिकृत होर्डिंग्ज काढून टाका. मालक व फ्लेक्स लावणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याचे आदेश दिले होते.



### होर्डिंग्जचा लोखंडी सांगाडा निघणार कधी

» पुणे-सोलापूर व पुणे नगर महामार्गावर मोठ्या प्रमाणात अनधिकृत होर्डिंग्ज आहेत. जागा मालकांनी युक्ती करून फ्लेक्स काढला आहे. मात्र होर्डिंग्जचा लोखंडी साचा तसाच धोकादायकरीत्या लटकलेल्या अवस्थेत ठेवला आहे. त्यामुळे भविष्यात मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे होर्डिंग्जचा लोखंडी सांगाडा निघणार कधी? असा सवाल नागरिकांनी केला आहे.

यानुसार प्रशासनाने काही ठिकाणे कारवाई करीत दणका दिला आहे. तरीही जिल्हाधिकारी डॉ. दिवसे यांच्या आदेशाकडे दुर्लक्ष करीत अनधिकृत होर्डिंग्ज व्यवसाय जोमाने सुरु आहे. त्यामुळे प्रशासनातील काही अधिकारी व कर्मचारी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाची गांभीर्याने अंमलबजावणी करीत नसल्याची धक्कादायक बाब समोर येत आहे.

पुणे जिल्ह्यातील अनधिकृत होर्डिंग्जच्या जागा मालक व चालकाने एक क्लुप्ती वापरून कारवाई टाळण्यासाठी होर्डिंग्जवरील फ्लेक्स काढले आहेत. मात्र लोखंडाचा सांगाडा तसाच धोकादायकरीत्या लटकलेल्या अवस्थेत ठेवला आहे.

यास प्रशासन पूर्णपणे जबाबदार असून त्यांच्याकडून कारवाईच्या नावाखाली कागदी घोडे नाचविले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. त्यामुळे प्रशासनाकडून केलेल्या लुटुपुटू कारवाईमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

### कारवाईची बडगा कधी उगारणार

» पीएमआरडीए, जिल्हा प्रशासन व स्थानिक स्वराज्य संस्थांनी कारवाईच्या नावाखाली केवळ कागदी घोडे नाचाविल्याचे समोर येत आले. त्यामुळे अनधिकृत होर्डिंग्जचा जागा मालक व चालकाचे फावले आहे. अनधिकृत होर्डिंग्जवर प्रशासनाच्या वतीने कारवाईची बडगा का उगारला जात नाही, असा सवाल नागरिकांनी केला आहे. होर्डिंग्जचा जागा मालक व चालकांवर कारवाई कधी होणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागून राहिले आहे.

### दुर्घटना घडल्यास जबाबदार कोण?

» घाटकोपरमध्ये अनधिकृत होर्डिंग्ज कोसळून 18 जणांचा मृत्यु झाला होता. तर 75 हून अधिक जण जखमी झाले होते. लोणी काळभोर येथीलही दुर्घटनेत तिघेजण जखमी झाले होते. सुदैवाने मोशी घटनेत केवळ वाहनांचे नुकसान झाले होते. हडपसर, शेवाळेवाडी, मांजरी कदमवाकवस्ती, लोणी काळभोर, थेऊर, कुंजीरवाडी, सोरतापवाडी, उरुळी कांचन, वाघोली, केसनंद, लोणीकंद, पेरणे, कोरेगाव भीमा परिसरात अनधिकृत होर्डिंग्ज नागरी वस्तीत आहेत. होर्डिंग्जच्या खाली टपऱ्या, दुकाने, हॉटेल, हातगाड्या मोठ्या प्रमाणात आहेत. भविष्यात सांगाडा कोसळून अजून दुर्घटना घडली तर याला जबाबदार कोण, असा सवाल नागरिकांनी केला आहे.

# जेसीबी,ट्रॅक्टरचे दर वाढल्याने शेतकरी अडचणीत

## जेसीबीचा तासाचा दर हजार ते बाराशे तर ट्रॅक्टरसाठी सहाशे ते सातशे रुपयापर्यंत शेतकऱ्यांकडे पैशाची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

सध्या तालुक्यामध्ये मान्सूनच्या आगमनानंतर शेतीपूरक कामांना जोमाने सुरुवात झाली आहे. वेगवेगळ्या ठिकाणी शेतीच्या मशागतीच्या कामांना गती आली आहे. भात पेरणी उरकत आली असून शेतीची अन्य कामे करण्यात शेतकरी वर्ग गुंतला आहे.

परंतु सद्यस्थितीत प्रत्येक ठिकाणी पारंपारिक नांगरणी, ओढणी, चिखलणी व अन्य मशागत कामांसाठी लोकांना ट्रॅक्टर, जेसीबी अशा आधुनिक साधनांवर आवलंबून राहावे लागत आहे.

मात्र, जेसीबी व ट्रॅक्टरचा तासाचा दर वाढल्यामुळे ही साधने उपलब्ध होत नसल्यामुळे व जी उपलब्ध होतात ते मालक आवाच्या सव्वा पैशाची मागणी शेतकऱ्यांकडे करीत असल्यामुळे त्यांच्यात चिंतेचे



> राजगड परिसरातील आंबवणे सर्कलमधील सर्व गाव कामगार तलाठी यांना सूचना देण्यात आल्या आहेत की, आपल्या परिसरामध्ये ज्या ज्या ठिकाणी बेकायदा बांधकामात जेसीबी, ट्रॅक्टर अथवा अन्य जी काही साधने असतील त्यासह त्यांच्या मालकांवर तातडीने दंडात्मक कारवाई करून या मशीनरी जप्त कराव्यात. शिवाय कुठेही या लोकांकडून शेतकऱ्यांची पिळवणूक होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी
>
> - रतन कांबळे, मंडलाधिकारी आंबवणे सर्कल (ता.राजगड)

वातावरण आहे.

बांधकाम किंवा इतर कामांसाठी भरपूर पैसे मिळत असल्याने तेवढ्याच पैशांची मागणी जेसीबी मालक व ट्रॅक्टर मालक हे शेतकऱ्यांकडे करीत आहे. मोठी रक्कम देणे हे शेतकऱ्यांना शक्य नसल्याने शेतीची कामे खोळंबली आहेत.

सध्या जेसीबीचा एक तासाचा दर हजार ते बाराशे रुपये असून ट्रॅक्टरसाठी सहाशे ते सातशे रुपयापर्यंत पैशाची मागणी शेतकऱ्यांकडे केली जात आहे. प्रत्यक्ष इंधनाचे दर वाढले तरी इतका दर अन्य ठिकाणी नाही. जो राजगड तालुक्यात आहे. हे सर्व माहीत असूनही प्रशासन याकडे लक्ष देत नाही ही शोकांतिका आहे.

खरीपपूर्व मशागतीची कामे हळूहळू सुरु होत आहेत. सध्या तापमान वाढल्याने शेतीकामांना जणू विश्रांतीच देण्यात आली आहे. मात्र हळूहळू मशागतीची कामे काही ठिकाणी होताना दिसून येत आहे. यंदा मात्र डिझेल दरवाढीमुळे ट्रॅक्टरचे भाडे प्रतितास एक हजार रुपयांवर पोहोचले आहे. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे.

अवकाळी पावसामुळे शेतजमिनीत योग्य ओलावा निर्माण झाला आहे. खरीप व रब्बी पीक निघाल्यावर शेतकरी शेतजमीन नांगरणी करून ठेवत असतात. त्यामुळे नांगरणी केली जात आहे. सध्या शेतातील कामे सर्रास ट्रॅक्टरने केली जात आहेत. त्यामुळे ट्रॅक्टर मालकांना गावात रोजगार उपलब्ध होऊन चार पैसे पदरी पडताना दिसून येत आहेत. रब्बी हंगाम संपल्यावर शेतातील पाऱ्या, धुऱ्याची दुरुस्ती करीत असतात.